Original

घरकुल योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) लाभार्थ्यांना हिवाळयात थंडीपासून संरक्षण करण्यासाठी २ ब्लँकेट व २ सतरंजी (लोकरी चादर) इत्यादी उपलब्ध करुन देणेबाबत..

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक - इबीसी -२०११/प्र.क्र.१६५/अजाक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७ मार्च, २०१२

**वाचा :-**

१ शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्र.बीसीएच-२००८/प्र.क्र.१५९/मावक-२, दि.१५.११.२००८ व दि.९.३.२०१०
२ शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
क्रमांक- भांखसं-१०८८/२५१२/उ-६, दि.२.३.१९९२
३ उद्योग संचालनालय यांचे परिपत्रक क्रमांक- उसं/भांखसं/बॅरेक ब्लँकेट/दर निश्चिती/(३१)/२०११-२०१२/बी-१५१७२, दि.११.८.२०११
४ उद्योग संचालनालय यांचे परिपत्रक
क्रमांक- उसं/भांखसं/लोकरीचे सूत, लोकरीच्या चादरी (आसन पट्ट्या) दर निश्चिती/(१२)/२०११-२०१२/बी-१६५७५, दि.२५.८.२०११
५ शासन पत्र क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र. /विघयो-२, दि.१.७.२०११
६ संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे यांचे पत्र
क्र.सकसं/मावक/घरकुल/ब्लँचा/२०११-२०१२/का-१२/९७४/दि.८.११.२०११
७ शासन शुध्दीपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्र.इबीसी-२००८/प्र.क्र.१६५/अजाकक-२, दिनांक २६ मार्च, २०१२

<u>प्रस्तावना :-</u> अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी त्यांचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवा-याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्याचा शासनाने निर्णय घेवून तसा शासन निर्णय दि.१५.११.२००८ अन्वये निर्गमित केला आहे. त्यानुसार घरकुल योजनेचे काम शासनाच्या विविध यंत्रणामार्फत चालू आहे. राज्यात अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंब मोठ्या प्रमाणावर दारिद्रय रेषेखालील असून त्यात कुपोषित बालकांचे प्रमाणा जास्त आहे. तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील बरेच निराधार, विधवा व परित्यक्त्या महिला आहेत. त्यांच्याकडे थंडीपासून संरक्षण करणेसाठी पुरेशी वस्त्रे (उदा.अंथरुण पांघरुण) उपलब्ध नसतात. त्यातील कुपोषित बालकांना थंडीपासून संरक्षण करणेसाठी पर्याप्त गरम कापड नसते. त्यामुळे दारिद्रय रेषेखालील विधवा व परित्यक्त्या महिला, अनुसूचित जाती, कुपोषित बालके असलेली कुटुंबे, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता/पुरुष असे दारिद्रय रेषेखालील घरकुल बांधून दिलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील कुटुंबांना प्रति कुटुंब २ ब्लँकेट व २ सतरंजी (लोकरी चादर) देणेबाबत शासन स्तरावरुन अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील घरकुल मंजूर केलेल्या लाभार्थ्यांना पुरविल्यास त्यांचा नक्कीच फायदा होऊन थंडीपासून संरक्षण मिळेल, अशी धारणा आहे. ही बाब विचारात घेता घरकुल योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) लाभार्थ्यांना हिवाळयात थंडीपासून संरक्षण करण्यासाठी २

**शासन शुध्दीपत्रक :-** वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील ग्रामीण व तसेच नगरपालिका क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना प्रत्येकी २ ब्लँकेट व २ सतरंजी (लोकरी चादर) इत्यादी उपलब्ध करुन देण्याची योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्याच्या प्रस्तावास शासन मान्यता देत आहे.

२. याकरीता आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबाना दर्जेदार ब्लँकेटस पुरविण्याची सर्वस्वी जबाबदारी आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांची राहील.

३. यावर होणारा खर्च लेखाशीर्ष "मागणी क्रमांक-एन-२, २२१६, गृहनिर्माण, ८०० इतर खर्च (००) (००) (०१) अनुसूचित जाती व नवबौध्द लोकांसाठी घरकुल योजना (नागरी) (विघयो), ३३ अर्थसहाय्य (२२१६२५३१) (नागरी) व (२२१६२५४८) (ग्रामीण)(विघयो)" या लेखाशीर्षाखाली खर्ची घालून त्याखाली केलेल्या वित्तीय तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. हा शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेताक क्र. २०१२०३२६०६५०००३०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दिनेश वाघमारे)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:
मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
मा.आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे.
सर्व उपायुक्त, समाजकल्याण,
सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण,
सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषदा,
निवड नस्ती मावक-२.